
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2018
तरुण भारत

# विद्या परिषद, परिक्षा मंडळाचा निर्णय ठरणार महत्वाचा

**कोल्हापूर :** कला, वाणिज्य विद्याशाखेची सेमिस्टर परीक्षा पद्धत बंद करावी, असा ठराव शिवाजी विद्यापीठाच्या अभिसभेत मंगळवारी झाला. मात्र, या ठरावाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी परीक्षा मंडळ घ विद्या परिषद या अधिकार मंडळाचा निर्णय महत्वाचा ठरणार आहे.




सुमारे दहा वर्षांपूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठाने सेमिस्टर पद्धतीचा अवलंब केला. सध्या सर्वच विद्या शाखा व अभ्यासक्रमांच्या परीक्षा सेमिस्टर पद्धतीने होत आहेत. सेमिस्टरमुळे विद्यापीठ व महाविद्यालयांना वर्षातून दोनवेळा परीक्षेचे कामकाज करावे लागत आहे. मंगळवारी अधिसभेत झालेला ठराव आता विद्यापीठाच्या परीक्षा मंडळासमोर चर्चेसाठी मांडण्यात येईल. यानंतर पुन्हा संबंधित ठराव विद्या परिषदेमध्ये सादर होईल. या दोन्ही अधिकार मंडळांनी जर सेमिस्टर बंद करण्याबाबत सकारात्मकता दाखवली व कुलपतींनी त्याला मान्यता दिली तरच कला, वाणिज्य शाखेच्या परीक्षा वार्षिक पद्धतीने होतील. सकारात्मक निर्णय झाल्यास, प्रथम पदवीच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सेमिस्टर पद्धतीने होतील. त्यानंतर द्वितीय व तृतीय वर्षाला संबंधित पध्दती लागू होईल.

**विद्यापीठाच्या अधिसभेत सेमिस्टर पध्दती बंद करण्याचा ठराव मंजुर**


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर प्रा. जाधव यांची निवड



**इचलकरंजी (प्रतिनिधी) :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा. डॉ. सुभाष जाधव यांची शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर कुलगुरू निर्देशित सदस्य म्हणून निवड झाली. या निवडीसाठी त्यांना प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत




## साहित्य भान

रणधीर शिंदे

# जोतिबाच्या नावानं...

चैत्र महिन्याच्या अखेरीस कोल्हापूर परिसर दुमदुमतो तो जोतिबाच्या जत्रेने. महाराष्ट्र आणि लगतच्या प्रदेशातील अनेकांचे कुलदैवत अशी जोतिबाची ओळख. चैत्री पुनवेला वाडीरत्नागिरीचा डोंगर फुलून येतो. कधीकाळी घोड्यावरून, पायी किंवा घुंगूरनादाच्या बैलगाडीतून लोक येत. खोबऱ्याची उधळण, दवणा, सासनकाठ्या, जोतिबाची गाणी, गुलालाची उधळण आणि 'चांगभलं'च्या जयघोषाने सारा डोंगर आसमंत निनादतो. घरचा उंबरा सुखानं नांदू दे किंवा देवा जोतिबा तुझं मला लय याड, अशी सद्भावनाही त्यामागे. लोकदैवतांच्या रचिताने समाजजीवन वाहत आलेले आहे. पुराणग्रंथ, दंतकथा, पुराणकथा, गाणी व गोष्टींमधून जोतिबा रचला गेला. जोतिबाचा लोकमानसातील इतिहास हा रंजक स्वरूपाचा आहे. दैवतांच्या मिथकरचिताला समाजेतिहासाच्या सत्याभासाचा स्पर्श असतो. गोष्टीतले मूळपण त्यात दडलेले असावे. पुढच्या पिढ्या तो कल्पकतेच्या डोलाऱ्यांनी सजवितो. त्यातील कथा-उपकथांना नव्या वाटा-उपवाटा फुटतात. त्यामुळे मूळ सत्त्वापर्यंत जाण्याची वाट धूसर होते. लिखित तसेच मौखिक परंपरेतल्या अनेक गोष्टींमधून जोतिबा विषयीचे काहीएक चित्र मनात तरळते.



जोतिबा प्रकाशाचा, उजेडाचा देव मानला जातो. सिंध प्रांतातून उत्तरेकडून तो आला आणि इथे स्थिरावला. ज्योत पाजळणे, दिवटी पाजळणे या अर्थानेही तो प्रचलित. हिमाचल प्रदेशात कांग्रा गावाजवळील टेकडीवर ज्वालामुखी नावाचे मंदिर आहे. तेथे भुईतून कायम ज्योत प्रज्वलित झालेली दिसते. तेजरूपाची उपासना करणारे लोक स्थलांतरानिमित्ताने या परिसरात आले. त्यामुळे त्यांनी त्यांचा देवही इकडे आणला, असे मानले गेले. 'बा'मध्ये असणारा पितृदेवता, तसेच वीर युद्धनायक म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. तसेच त्याची एक वाट क्षत्रिय देवता, सैन्यनायक म्हणूनही जाते. युद्धसंघर्ष, मातृदेवता आणि त्यांच्यातील संघर्षाची रूपेही त्यात असावीत. जोतिबाच्या मूर्तीमधील खड्गधारित्व, त्रिशूल, डमरू आणि घोड्यावर विराजमान या गोष्टींतून वीरनायकाची प्रतिमा साकारते. क्षेत्रपाळ देवता अशी ही एक ओळख. भैरव, खंडोबा व रवळनाथ यांच्याशी जोतिबाचे नाते. केदारलिंग असेही एक नाव. रत्नासूर राक्षसापासून बचावासाठी अंबाबाई हिमालयात केदारलिंगाकडे साकडे घालण्यासाठी जाते. केदारलिंग येतो आणि रत्नासूर राक्षसास ठार मारतो. ज्या प्रदेशावर त्यास मारले तो झाला रत्नागिरी डोंगर, अशी आख्यायिका. 'उत्तरेचा देव दक्षिणेशी आला' अशी लोक समजूत. त्यामुळे मातृदेवतांच्या रक्षणासाठी देव इथेच राहिला. अशी समजूत कोल्हापूर आसपासच्या देवतांची ठाणी पाहिली तरीही काही कुतूहलजनक गोष्टी लक्षात येतात. त्र्यंबोली, कात्यायनी, उजळाई या देवतांची कोल्हापूर गाववेशीबाहेरील ठाणी ही रक्षक देवता आहेत. स्त्रीदेवतांच्या गणराज्यातील पुरुष देवतांचा हस्तक्षेप आणि त्यांच्या प्रभुत्वाचा वावरप्रदेश म्हणूनही त्याकडे पाहिले आहे. अलीकडे प्राचार्य राजेंद्र कुंभार या वाटेवरून नेणिवेतील प्रदेशाचा काही एक उलगडा करीत आहेत. तसेच कोल्हापूर-रत्नागिरी हा रस्ता प्राचीन. खाडी बंदराकडे जाणारा. त्यामुळे कर वसुली नाका म्हणूनही त्याचे काही नाते असावे का? अठराव्या शतकारंभी जोतिबा मंदिर रावजी सायाने बांधले. पुढे राणोजी शिंदे (ग्वाल्हेर) यांनी १७०३ साली आजचे देऊळ बांधले.

गाणी व गोष्टींमधून जोतिबाच्या खुणा विपुल जपलेल्या आहेत. या गाण्यांतून लोकमानसाने श्रद्धाभावाने, जिव्हाळ्याने जोतिबाशी संवाद साधला आहे. जोतिबाचे स्थानमहात्म्य, भू-वर्णने, जत्रादी उत्सव, निसर्ग, चरित्रकथा, युद्धवीर असे जोतिबाचे महिमान गायिले. 'पाठीच्या भैनीसंगं लगीन लावून गेला कसा.' या एका गाण्यातील ओळीने अनेक आख्यायिका कथांना वेगळे धुमारे फुटतात. या गाण्यांतून जोतिबाच्या वाटेवर दिसणाऱ्या भरगच्च दवण्याच्या, रोपांपासून, चैत मासाचं साजिवंत उन्हापर्यंतची रूपे रेखाटली. ती अतिशय गोड जिव्हाळ्याच्या संवादभाषेत. या गाण्यात काळाचे सामान्यीकरणही आहे. उदा. जोतिबाच्या वाटं फुटली गुलालाची पेवं, जनलोक म्हणीयती दावा निवदाला फवं (पोहे), असे अशा अनेक गोष्टी गाण्यांतून लोकमानसाने जोतिबास वाहते ठेवले आहे. या वाहतेपणाचा हा सोहळा.